(इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचे मराठी भाषांतर)

(२०२२) १ एस.सी.आर. १४८

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

विरूद्ध

दिलीप उत्तम जायभाय

(दिवाणी अपील क्र. ७४०३ / २०२१)

०३ जानेवारी, २०२२

[एम. आर. शहा आणि बी. व्ही. नागारत्ना न्यायमूर्तीगण]

महाराष्ट्र कामगार संघांना मान्यता देण्याबाबत आणि अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९७१ *:* विभागीय कार्यवाही - *बेदरकारपणे* आणि निष्काळजीपणे वाहन चालविल्याबद्दल उत्तरार्थी -चालकावर गैरवर्तन सिद्ध झाले ज्यामुळे अपघात झाला ज्यात चार जणांचा मृत्यू झाला - *अनुशासन* प्राधिकरणाने सेवेतून बडतर्फ करण्याचे आदेश दिले - कामगार न्यायालयाने सबळ कारणे देऊन *आणि फौजदारी न्यायालयाने दिलेल्या दोषमुक्तीच्या आदेशासह अभिलेखावरिल संपूर्ण साक्षीपुराव्याचे पुर्नमुल्यांकन करून* बडतर्फीच्या आदेशात हस्तक्षेप केला नाही - तथापि, *जरी* औद्योगिक न्यायालयाने गैरवर्तणुकीवर शिस्तपालन प्राधिकरणाने नोंदविलेल्या निष्कर्षांमध्ये हस्तक्षेप केला नाही, *तरी* केवळ बडतर्फीची शिक्षा *सिद्ध* गैरवर्तनाच्या *प्रमाणबाह्य* आहे आणि १९७१ च्या *अधिनियमाच्या* अनुसूची-४ च्या *बाब* क्रमांक १ (जी) नुसार ती अन्यायकारक कामगार प्रथा आहे या

कारणास्तव बडतर्फीच्या आदेशात हस्तक्षेप केला - *त्यामध्ये* उच्च न्यायालयाने हस्तक्षेप केला *नाही* - अपीलावर, *असा निष्कर्ष नोंदविण्यात आला की :* चौकशी अधिकाऱ्याचे निष्कर्ष आणि कामगार न्यायालय आणि औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार उत्तरारर्थी-कामगार इतक्या वेगाने आणि बेदरकारपणे वाहन चालवत होते ज्यामुळे अपघात झाला होता ज्यात चार जणांचा मृत्यू झाला – उत्तरारर्थी - *चालकाला, जो भारतीय दंड संहिता* कलम २७९ आणि ३०४ (अ) अन्वये खटल्याला सामोरे जात *होता, निर्दोष सोडताना फौजदारी न्यायालयाने* असे निरीक्षण नोंदवले की ही घटना केवळ उत्तरारर्थीच्या बेदरकारपणे आणि निष्काळजीपणे वाहन चालविण्यामुळे आणि इतर *कोणाच्याहीमुळे* नाही घडली आहे हे सिद्ध करण्यात अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे - म्हणूनच, *जीपचा चालकसुद्धा निष्काळजी होता* असे गृहीत धरले तरी ते हानिकारक हयगय असल्याचे प्रकरण म्हणता येईल - याचा अर्थ असा नाही की उत्तरारर्थी-कामगार अजिबात निष्काळजी *नव्हता* - म्हणून, त्याने त्याला गैरवर्तनापासून मुक्त केले नाही - कायद्याच्या *आधारभूत* तत्त्वानुसार फौजदारी *न्यायचौकशीतील* दोषमुक्तीचा शिस्तभंगाच्या *कार्यवाहीवर* कोणताही परिणाम किंवा *संबंद्धता नसते* कारण दोन्ही प्रकरणांमधील *पुराव्यांचे प्रमाण वेगळे आहेत* आणि कार्यवाही वेगवेगळ्या क्षेत्रात आणि भिन्न उद्दिष्टांसह चालते - म्हणून, फौजदारी न्यायालयाने उत्तरारर्थीची निर्दोष मुक्तता करण्यावर जास्त भर देताना औद्योगिक न्यायालयाने चूक केली - अधिनियम, १९७१ च्या अनुसूची-४ मधील खंड क्रमांक १ (जी) *चालु प्रकरणाला* लागू करताना, असे म्हणता येणार नाही की उत्तरारर्थीची बडतर्फी गैरवर्तनाच्या स्वरूपाचा विचार न करता किरकोळ किंवा तांत्रिक स्वरूपाच्या गैरवर्तणुकीसाठी होती - उत्तरारर्थीच्या सेवेच्या मागील नोंदीचाही औद्योगिक *न्यायालयाकडून* विचार केला गेला नाही - अपीलकर्त्याच्या प्रकरणानुसार, उत्तरारर्थी कामगार तीन वर्षे सेवेत होता आणि तीन

वर्षांच्या सेवेच्या कालावधीत त्याला चार वेळा शिक्षा झाली - म्हणून, असे म्हणता येणार नाही की उत्तरार्थीच्या सेवेच्या मागील *अभिलेखाचा* कोणताही विचार न करता *बडतर्फीचा* आदेश होता - म्हणूनच, प्रकरणातील **तथ्ये** आणि परिस्थितीमध्ये, औद्योगिक न्यायालयाने अधिनियम १९७१ च्या अनुसूची-४ मधील *खंड* क्रमांक १ (जी) चा चुकीच्या पद्धतीने वापर केला आणि बडतर्फीच्या आदेशात चुकीचा हस्तक्षेप केला.

अपील **मान्य** करत न्यायालयाने **असा निष्कर्ष नोंदवला की** : १. विभागीय चौकशीत चौकशी अधिकाऱ्याने नोंदवलेले निष्कर्ष आणि कामगार न्यायालय तसेच औद्योगिक न्यायालयाने दिलेला **न्यायनिर्णय** व आदेश आणि फौजदारी न्यायालयाने दिलेला **न्यायनिर्णय** व निर्दोष मुक्ततेचा आदेशही असे दर्शवितो की **उत्तरार्थी** वाहन चालवत असताना **विरूद्ध दिशेने** येणाऱ्या **जीपसोबत** अपघात झाला आणि या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला. **अभिलेखावरील पुराव्यावरुन** असे दिसून येते की, **अपघाताचा आघात विरूद्ध दिशेने** येणाऱ्या जीपला इतका झाला की जीप २५ फूट मागे **ढकलली गेली.** वरील तथ्यांवरून असे म्हणता येईल की **उत्तरार्थी** - कामगार एवढ्या वेगाने आणि बेदरकारपणे वाहन चालवत होता ज्यामुळे अपघात झाला होता ज्यात चार जणांचा मृत्यू झाला होता. **भारतीय दंड संहिता** कलम २७९ आणि ३०४ (अ) अन्वये **न्यायचौकशीला** सामोरे जात असलेल्या **उत्तरार्थी-चालकाची** निर्दोष मुक्तता करताना, फौजदारी न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की ही घटना केवळ आरोपी - **उत्तरार्थीच्या** बेदरकारपणे आणि निष्काळजीपणे वाहन चालविण्यामुळे आणि इतर **कोणाच्याही मुळे** नाही घडली हे सिद्ध करण्यात **अभियोग** पक्ष अपयशी ठरला. **त्यामुळेच** जीपचालकानेही **अधिक हलगर्जीपणा** केला असे गृहीत धरले, तरी हा **हानिकारक हयगय**

झाल्याचा प्रकार म्हणता येईल. याचा अर्थ **उत्तरार्थी**-कामगार अजिबात निष्काळजी **नव्हता,** असा होत नाही. त्यामुळे तो गैरवर्तनातून मुक्त होत नाही. [परिच्छेद १०.२]

२.१ कामगार न्यायालयाने फौजदारी न्यायालयाने दिलेल्या निर्दोष मुक्ततेच्या आदेशाचा **सविस्तर** विचार केला होता आणि **उत्तरार्थी**-कामगाराच्या वतीने केलेल्या युक्तिवादाशी सहमत नव्हते की फौजदारी न्यायालयाने त्याची निर्दोष मुक्तता केल्यामुळे त्याला शिस्तभंगाच्या कारवाईत दोषी ठरवता येणार नाही. फौजदारी न्यायालयाने दिलेला **न्यायनिर्णय** व **आदेशावरूनही असे** दिसून येते **की साक्षीदारांची फितूरी; हितसंबंधी साक्षीदाराने दिलेला पुरावा;** तपास अधिकाऱ्याच्या **तपासणीमधील** त्रुटी; घटनास्थळासाठी घटनेचा पंचनामा **करणारे** पंच, **इत्यादींच्या** आधारे **फौजदारी** न्यायालयाने उत्तरार्थीची निर्दोष मुक्तता केली. त्यामुळे **उत्तरार्थी विरूद्ध** वाजवी संशयापलीकडे खटला सिद्ध करण्यात **अभियोग** पक्ष अपयशी ठरल्याचे फौजदारी न्यायालयाने म्हटले आहे. याउलट विभागीय **कार्यवाहीत** बेदरकारपणे व निष्काळजीपणे वाहन **चालविण्याचे गैरवर्तन** ज्यामुळे अपघात झाला व त्यामुळे चार जणांचा मृत्यू झाला, हे **स्थापित आणि** सिद्ध झाले आहे. कायद्याच्या **आधारभूत** तत्त्वानुसार फौजदारी **न्यायचौकशीतील दोषमुक्तीचा** शिस्तभंगाच्या **कार्यवाहीवर** कोणताही परिणाम किंवा **संबंद्धता** नसते **कारण** दोन्ही प्रकरणांतील **पुराव्यांचे प्रमाण वेगळे** आहेत आणि कार्यवाही वेगवेगळ्या क्षेत्रात आणि भिन्न उद्दिष्टांसह चालते. त्यामुळे फौजदारी न्यायालयाने **उत्तरार्थी**ची निर्दोष मुक्तता करण्यावर जास्त भर देऊन औद्योगिक न्यायालयाने चूक केली आहे. असे असले तरी हे लक्षात घेणे आवश्यक आहे **की कार्यभार धारण केलेल्या** शिस्तपालन प्राधिकरणाने नोंदवलेले निष्कर्ष आणि विभागीय चौकशीत **सिद्ध झालेल्या गैरवर्तन सोबत** औद्योगिक

न्यायालयाने हस्तक्षेप केलेला नाही, आणि केवळ या कारणास्तव बडतर्फीच्या शिक्षेत हस्तक्षेप केला आहे की ते आश्चर्यकारकपणे **प्रमाणबाह्य** आहे आणि म्हणूनच **एम.आर.टी.यु. आणि पी.यु.एल.पी. अधिनियम, १९७१ च्या** अनुसूची-४ च्या **खंड** क्रमांक **१** (जी) नुसार अन्यायकारक कामगार प्रथा म्हणता येईल**.** [परिच्छेद १०**.३ आणि १०.४**]

२.२ एम.आर.टी.यु. आणि पी.यु.एल.पी. अधिनियम, १९७१ च्या अनुसूची-४ च्या **खंड** क्रमांक **१** (जी) सध्याच्या प्रकरणात **लागु करताना** असे म्हणता येणार नाही की **उत्तरार्थी**ची बडतर्फी गैरवर्तनाच्या स्वरूपाचा विचार न करता**,** किरकोळ किंवा तांत्रिक स्वरूपाच्या गैरवर्तणुकीसाठी होती**. उत्तरार्थी -** कामगाराला विशिष्ट आरोप आणि विशिष्ट गैरवर्तनासाठी दोषी ठरवण्यात आले आहे**. उत्तरार्थी**च्या सेवेच्या मागील **अभिलेखाचाही** औद्योगिक न्यायालयाने विचार केलेला नाही**. अपीलकर्ता - एम एस आर टी सी उत्तरार्थीच्या** प्रकरणानुसार **-** कामगार तीन वर्षांपासून सेवेत होता आणि तीन वर्षांच्या सेवेच्या काळात **त्याला** चार वेळा शिक्षा झाली**.** त्यामुळे बडतर्फीचा आदेश **उत्तरार्थी**च्या सेवेच्या मागील **अभिलेखाचा** विचार न करता झाला असे म्हणता येणार नाही**.** त्यामुळे या प्रकरणातील **तथ्ये** आणि परिस्थिती पाहता औद्योगिक न्यायालयाने **एम.आर.टी.यु. आणि पी.यु.एल.पी. अधिनियम, १९७१ च्या** अनुसूची-४ च्या **खंड** क्रमांक **१** (जी) चा चुकीच्या पद्धतीने वापर केला**.** [परिच्छेद १०.५]

३. असे असले तरी **सद्य प्रकरणाच्या तथ्यांमध्ये** विभागीय चौकशीत असे आढळून आले आहे की**,** चालक **- उत्तरार्थी** यांच्या बेदरकारपणे आणि निष्काळजीपणे वाहन

चालविल्यामुळे अपघात झाला ज्यात चार जणांचा मृत्यू झाला, **जेव्हा** बडतर्फीची शिक्षा ठोठावली जाते तेव्हा **तिला** धक्कादायक **प्रमाणबाह्य** शिक्षा म्हणता येणार नाही. विभागीय **कार्यवाहीमध्ये** प्रत्येक पैलूचा विचार करण्यात आला आहे. अगदी विभागीय **कार्यवाहीमध्ये** चौकशी अधिकाऱ्याने नोंदविलेल्या निष्कर्षांमध्ये औद्योगिक न्यायालयाने हस्तक्षेप केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणातील **तथ्ये** आणि परिस्थितीत औद्योगिक न्यायालयाने गंभीर चूक केली असून शिस्तपालन प्राधिकरणाने दिलेल्या **बडतर्फीच्या** आदेशात हस्तक्षेप करताना आपल्या **अधिकारक्षेत्राच्या पलीकडे गेलेला** आहे, ज्यात कामगार न्यायालयाने हस्तक्षेप केला नाही. [परिच्छेद ११]

४. हे देखील लक्षात घेणे आवश्यक आहे की औद्योगिक न्यायालयासमोर उत्तरार्थी-कामगार-**चालकाने** कबूल केले की बडतर्फीच्या आदेशानंतर **तो लाभदायकपणे कामाला लागलेला आहे**. त्यामुळे सेवेत सातत्य ठेवून सेवेत पुन्हा **सामावून घेण्याची हमी सुद्धा** आवश्यक **नाही. उत्तरार्थी**-कामगाराला **०१.११.२००३ ते ३१.०५.२०१८** या कालावधीतील वेतन देण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिलेले निर्देशही उच्च न्यायालयाने अपीलकर्त्याने दाखल केलेल्या रिट याचिकेत दिले जाऊ शकले नसते. ती कामगार-**उत्तरार्थीने** दाखल केलेली याचिका नव्हती. त्यामुळे असे असले तरी **आक्षेपित न्यायनिर्णय** व आदेशाच्या परिच्छेद ८ मध्ये दिलेले **निदेश** कायम ठेवता येणार नाहीत कारण ते उच्च न्यायालयासमोरील वादाच्या कक्षेबाहेर आहेत. [परिच्छेद **१२, १३**]

समर बहादूर सिंग विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य आणि इतर (२०११) ९ एससीसी ९४ **:** [२०११] ११ एससीआर १३६**;** भारत सरकार आणि इतर विरुद्ध सीताराम मिश्रा आणि *अन्य एक* **(२०१९) २० एससीसी ५८८ -** संदर्भित**.**

<u>न्यायनिर्णयविधी संदर्भ</u>

[२०११] ११ एससीआर **१३६**	**परिच्छेद ५.२**	संदर्भित
(२०१९) २० एससीसी **५८८**	**परिच्छेद ५.२**	संदर्भित

दिवाणी अपिलीय न्यायाधिकारीता : दिवाणी अपील क्रमांक ७४०३ / २०२१.

मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्रमांक ८४०१ / २०१४ मधील दिनांक २३.०१.२०२० च्या न्यायनिर्णय व आदेशावरून.

अपीलकर्त्यासाठी अधिवक्ते कु. मयुरी रघुवंशी, व्योम रघुवंशी, कु. पुर्वत वाली.

प्रतिवादींसाठी अधिवक्ते निशांत पाटील, कु. मालविका काला.

न्यायमूर्ती एम. आर. शहा यांच्या द्वारे न्यायालयाचा न्यायन्यायनिर्णय देण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक ८४०१ / २००३ मधील, २३.०१.२०२० रोजी दिलेल्या आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेश, ज्याद्वारे उच्च न्यायालयाने अपीलकर्ता - महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (पुढे "एमएसआरटीसी" म्हणून संबोधले जाते) यांनी दाखल केलेली रिट याचिका फेटाळून लावली आहे ज्यात औद्योगिक न्यायालयाने पुनरीक्षण अर्ज क्रं. १३/२००२ मध्ये उत्तरार्थीला थकित वेतनाशिवाय परंतु सेवेत सातत्य ठेवून पुन्हा

सेवेत सामावून घेण्याचे निदेश दिलेल्या आदेशाला आव्हानित केले आहे, त्याबद्दल व्यथित आणि असमाधानी होऊन मूळ रिट याचिकाकर्ते - एमएसआरटीसीने सद्य अपील दाखल केलेले आहे.

२. येथे उत्तरार्थी प्रवासीबसचा चालक म्हणून काम करत होता आणि प्रवासीबस चालवत होता. २३.१०.१९९२ रोजी जेव्हा तो बस चालवत असताना त्यांचा विरूद्ध दिशेने **येणाऱ्या** जीपसोबत **अपघात झाला.** बस डावीकडे नेण्याऐवजी त्याने चुकीच्या बाजूला असलेल्या अगदी उजव्या बाजूला बस नेली आणि परिणामी जीप आणि बसची धडक झाल्याचे दिसून येत आहे. या अपघातात चार प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला तर सहा प्रवासी गंभीर जखमी झाले. जीपचे रेडिएटर आणि इंजिन बोर्ड तुटून नुकसान झाल्याने जीपचे पूर्णपणे नुकसान झाले असून जीपचा आतील भाग पूर्णपणे चिरडला गेला आहे. धडकेचा आघात इतका जोरदार होती की, जीप सुमारे २५ फूट मागे ढकलण्यात आली. बसचा बंपरही चिरडला गेला. जीपचा चालकही जखमी झाला. उत्तरार्थीची शिस्तभंगाची चौकशी करण्यात आली. चौकशी अंती त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले. त्याच्यावर भारतीय दंड संहिता कलम २७९ अन्वये खटला ही चालवण्यात आला होता. पण त्याची निर्दोष मुक्तता झाली. (त्याची निर्दोष मुक्तता येथे खाली हाताळली जाईल). बडतर्फीच्या आदेशाला उत्तरार्थीने कामगार न्यायालयात आव्हानित केले. कामगार न्यायालयाने बडतर्फीचा आदेश कायम ठेवला. फौजदारी कारवाईत उत्तरार्थीची निर्दोष मुक्तता आणि दोन्ही वाहनांच्या चालकांनी हलगर्जीपणा (हानिकारक हयगय) केल्याचे निरीक्षण नोंदवत औद्योगिक न्यायाधिकरणाने महाराष्ट्र कामगार संघांना मान्यता देण्याबाबत आणि अनुचित कामगार प्रथांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९७१ च्या **अनुसूची**-४ **च्या** खंड **क्रमांक** १ (**जी**) अन्वये

अधिकारांचा वापर केला. (थोडक्यात “एम.आर.टी.यु. आणि पी.यु.एल.पी. अधिनियम, १९७१”) आणि बडतर्फीचा आदेश सिद्ध झालेल्या गैरवर्तनापेक्षा प्रमाणबाह्य असल्याचे म्हटले आहे. औद्योगिक न्यायाधिकरणासमोर उत्तरार्थी/कामगाराने थकित वेतनासाठी जोर देत म्हणणे मांडले नाही. औद्योगिक न्यायाधिकरणाने त्यांना थकित वेतन न देता, परंतु सेवेत सातत्य ठेवून पुन्हा सेवेत सामावून घेण्याचे निर्देश दिले.

३. औद्योगिक न्यायाधिकरणाने ३१.०७.२००३ रोजी दिलेल्या थकित वेतन न देता परंतु सेवेत सातत्य ठेवून पुन्हा सेवेत सामावून घेण्याच्या आदेशामुळे व्यथित आणि असमाधानी वाटल्याने अपीलकर्त्याने उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली. या आक्षेपित न्यायनिर्णय व आदेशाद्वारे उच्च न्यायालयाने अपीलकर्त्याने केलेली रिट याचिका तर फेटाळून लावलीच, पण अपीलकर्त्याला ०१.११.२००३ ते ३१.०५.२०१८ या कालावधीत म्हणजेच निवृत्तीची तारीख असलेल्या थकित वेतन देण्याचे निदेशही दिले आहेत. तसेच उत्तरार्थीला बडतर्फीच्या तारखेपासून ते निवृत्तीपर्यंत सेवेत सातत्य असल्याच्या आधारे निवृत्तीचे लाभ मिळतील, असे निदेशही उच्च न्यायालयाने दिले आहेत.

४. रिट याचिका फेटाळून आणि बडतर्फीचा आदेश रद्द करून थकित वेतन आणि सेवा सातत्य ठेवून पुन्हा सेवेत सामावून घेण्याचे आदेश देण्याच्या औद्योगिक न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशावर शिक्कामोर्तब करून उच्च न्यायालयाने दिलेल्या आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेशाने त्याबद्दल व्यथित आणि असमाधानी होऊन एमएसआरटीसीने सद्य अपील दाखल केलेले आहे.

५. अपीलकर्त्या - एमएसआरटीसीच्या वतीने बाजू मांडणाऱ्या विद्वान वकील मयुरी रघुवंशी यांनी ठामपणे सादर केले की, या प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थितीमध्ये सदर बडतर्फीचा आदेश सिद्ध झालेल्या गैरवर्तनापेक्षा प्रमाणबाह्य या कारणावरून शिस्तपालन प्राधिकरणाने दिलेल्या आदेशात हस्तक्षेप करून औद्योगिक न्यायालयाने गंभीर चूक केली आहे.

५.१ उच्च न्यायालय आणि औद्योगिक न्यायालय या दोघांनीही शिस्तभंगाची चौकशी आणि फौजदारी कारवाई यातील फरकाचा अजिबात विचार केलेला नाही आणि/किंवा त्याचे आकलन केलेले नाही.

५.२ फौजदारी खटल्यातील प्रतिवादींची निर्दोष मुक्तता करण्यावर विसंबून राहून उच्च न्यायालय तसेच औद्योगिक न्यायालयाने चूक केली होती, असे नमूद करण्यात आले आहे. दोन्ही प्रकरणांतील पुराव्यांचा दर्जा वेगळा असल्याने आणि कार्यवाही वेगवेगळ्या क्षेत्रात चालते आणि भिन्न उद्दिष्ट असल्याने या दोषमुक्तीचा शिस्तभंगाच्या प्रक्रियेवर कोणताही परिणाम किंवा संबंधता नाही, हे औद्योगिक न्यायालय आणि उच्च न्यायालय समजून घेण्यात अपयशी ठरले आहे, असे सादर करण्यात आला आहे. समर बहादूर सिंग विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य आणि **इतर,** (२०११) ९ एससीसी ९४ आणि भारत सरकार विरुद्ध सीताराम मिश्रा आणि अन्य**,** (२०१९) २० एससीसी ५८८ या खटल्यांमध्ये या न्यायालयाच्या **न्याय**निर्णयांवर **भर देण्यात आला आहे.**

५.३ पुढे असे सादर केले जाते की, खरे तर फौजदारी खटल्यातील निर्दोष मुक्तता उत्तरार्थीला मदतगार ठरणार नाही कारण तपास अधिकारी, घटनास्थळाच्या पंचनाम्यासाठी

पंच आदींची तपासणी करण्यात अभियोग पक्षाला अपयश आल्याने आणि संशयापलीकडे आपली बाजू सिद्ध करण्यात अभियोग पक्षाला आलेल्या अपयशावर फौजदारी खटल्यातील निर्दोष मुक्तता झालेली आहे, हे कामगार न्यायालयाने योग्यच मानलेले आहे. दुसरीकडे असे सादर करण्यात आले की विभागीय कामकाजात गैरप्रकार झाल्याचे सिद्ध झाले आहे. त्यामुळे असे सादर करण्यात आले की फौजदारी खटल्यातील उत्तरार्थीची निर्दोष मुक्तता करण्याला औद्योगिक न्यायालय आणि उच्च न्यायालयाने अवाजवी महत्त्व द्यायला नको होते.

५.४ पुढे असे सादर केले जाते की, अन्यथा सुद्धा जिथे निष्काळजीपणे आणि हलगर्जीपणे वाहन चालविण्याच्या उत्तरार्थीच्या या हलगर्जीपणामुळे वाहन अपघातात चार जणांचा मृत्यू झाला आणि त्यांच्या तीन वर्षांच्या कार्यकाळात त्याला यापूर्वी चार वेळा शिक्षा झाली, प्रकरणातील या तथ्ये व परिस्थितीमध्ये बडतर्फीची शिक्षा धक्कादायकरित्या प्रमाणबाह्य होती असे म्हणता येणार नाही. या प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थिती पाहता हे प्रकरण एम.आर.टी.यु. आणि पी.यु.एल.पी. अधिनियम, १९७१ च्या **अनुसूची**-४ **च्या** खंड **क्रमांक** १ (**जी**) अंतर्गत येणार नाही, असे सादर करण्यात आले आहे.

५.५ पुढे असे सादर केले जाते की, औद्योगिक न्यायालयानेही आदेशात हे गैरवर्तन किरकोळ किंवा तांत्रिक स्वरूपाचे नाही, असे विशेषपणे निरीक्षण केले आहे. औद्योगिक न्यायालयाने असेही निरीक्षण नोंदवले आहे की, यात कोणतीही सुड बुध्दीने आणि एमएसआरटीसीची कारवाई चांगल्या हेतू न ठेवता झाली असे म्हणता येणार नाही. औद्योगिक न्यायालयाने असेही निरीक्षण नोंदवले की एमएसआरटीसीने तक्रारदार - उत्तरार्थीला खोटया प्रकरणात अडकवले नाही किंवा स्पष्ट चुकीच्या कारणास्तव उत्तरार्थीला बडतर्फ केले नाही आणि म्हणूनच उत्तरार्थी एम.आर.टी.यु. आणि पी.यु.एल.पी. अधिनियम, १९७१ नुसार

कथित अनुचित कामगार प्रथा सिद्ध करण्यात अपयशी ठरला. तथापि, असे सादर केले जाते की औद्योगिक न्यायालयाने एम.आर.टी.यु. आणि पी.यु.एल.पी. अधिनियम, १९७१ च्या **अनुसूची-४ च्या** खंड **क्रमांक** १ (**जी**) चा वापर करून शिस्तपालन प्राधिकरणाने लादलेल्या शिक्षेच्या/ बडतर्फीच्या आदेशात हस्तक्षेप केला आहे.

५.६ पुढे असे सादर केले जाते की उत्तरार्थीने देखील कबूल केले की त्याला बडतर्फ केल्यानंतर लाभदायकपणे कामाला लागलेला आहे. त्यामुळे पुन्हा सेवेत सामावून घेण्याच्या आदेशाची अजिबात गरज नव्हती.

५.७ अपीलकर्त्याच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान वकिलाने पुढे असे सादर केले की अन्यथा सुद्धा उच्च न्यायालयाने न्यायनिर्णय आणि आदेशातील परिच्छेद ८ मध्ये अपीलकर्ता - एमएसआरटीसीला १ नोव्हेंबर, २००३ ते ३१ मे, २०१८ या कालावधीतील थकित वेतन देण्याचे दिलेले निदेश अपीलकर्ता - एमएसआरटीसीने दाखल केलेल्या याचिकेत पारित केले जाऊ शकत नाहीत. त्यामुळे असा आदेश उच्च न्यायालयातील रिट याचिकेच्या कक्षेबाहेर असल्याचे सादर करण्यात आले.

६. वरील निवेदने करताना प्रस्तुत अपीलाला परवानगी द्यावी, अशी विनंती केली आहे.

७. उत्तरार्थीच्या वतीने बाजू मांडणारे विद्वान वकील निशांत पाटील यांनी औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या आणि उच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केलेल्या न्यायनिर्णयाचे व आदेशाचे समर्थन केले आहे.

७.१ असे सादर केले जाते की या प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थितीमध्ये जेव्हा औद्योगिक न्यायालयाला बडतर्फीचा आदेश सिद्ध झालेल्या गैरवर्तनापेक्षा प्रमाणबाह्य

असल्याचे आढळून आले, तेव्हा एम.आर.टी.यु. आणि पी.यु.एल.पी. अधिनियम, १९७१ च्या **अनुसूची-**४ **च्या** खंड **क्रमांक** १ (**जी**) नुसार ती अन्यायकारक कामगार प्रथा म्हणता येईल. अशा प्रकारे औद्योगिक न्यायालयाने बडतर्फीच्या आदेशात योग्य हस्तक्षेप केला आणि त्यास उच्च न्यायालयाने योग्य दुजोरा दिला आहे.

७.२ असा युक्तीवाद केला की सध्याच्या प्रकरणात उत्तरार्थी - चालकाची काहीच अशी चूक नव्हती. विरूद्ध दिशेने येणारा जीपचालक रस्त्याच्या चुकीच्या बाजूला होता आणि उत्तरार्थीने अपघात टाळण्याचा प्रयत्न केला. असे सादर केले जाते की गुन्हेगार जीप चालकानेही निष्काळजीपणा केल्याचे आढळले आणि फौजदारी न्यायालयाने उत्तरार्थी – चालकाची निर्दोष मुक्तता केली ही वस्तुस्थिती विचारात घेता, थकित वेतन न देता परंतु सेवेत सातत्य ठेवून पुन्हा सेवेत सामावून घेण्याचा औद्योगिक न्यायालयाने दिलेला न्यायनिर्णय आणि आदेश यात कोणत्याही हस्तक्षेपाची आवश्यकता नाही. त्यामुळे थकित वेतन न देता परंतु सेवेत सातत्य ठेवून पुन्हा सेवेत सामावून घेण्याचा औद्योगिक न्यायालयाने दिलेला न्यायनिर्णय आणि आदेश यात उच्च न्यायालयाने योग्य हस्तक्षेप केला नाही , असे सादर करण्यात आले आहे.

८. वरील युक्तिवाद करताना प्रस्तुत अपील फेटाळण्याची विनंती केली जाते.

९. आम्ही संबंधित पक्षकारांच्या वतीने बाजू मांडणारे विद्वान वकील सविस्तर ऐकले आहेत.

१०. सुरुवातीला, हे लक्षात घेणे आवश्यक आहे की विभागीय कारवाईत उत्तरार्थी - चालकावर बेदरकारपणे आणि हलगर्जीपणे वाहन चालविल्याचा कथित आरोप सिद्ध झाला

आहे ज्यामुळे अपघात झाला ज्यात चार जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर, शिस्तपालन प्राधिकरणाने बडतर्फीचा आदेश पारित करत उत्तरार्थी - कामगाराला सेवेतून बडतर्फ केले. *कामगार न्यायालयाने सबळ कारणे* देऊन आणि फौजदारी न्यायालयाने दिलेल्या दोषमुक्तीच्या आदेशासह अभिलेखावरिल संपूर्ण साक्षीपुराव्याचे पुर्नमुल्यांकन करून *बडतर्फीच्या आदेशात हस्तक्षेप केला नाही. तथापि*, जरी *औद्योगिक न्यायालयाने गैरवर्तणुकीवर शिस्तपालन प्राधिकरणाने नोंदविलेल्या निष्कर्षांमध्ये हस्तक्षेप केला नाही*, तरी *केवळ बडतर्फीची शिक्षा* सिद्ध *गैरवर्तनाच्या* प्रमाणबाह्य *आहे आणि १९७१ च्या* अधिनियमाच्या *अनुसूची-४ च्या* बाब *क्रमांक १ (जी) नुसार ती अन्यायकारक कामगार प्रथा आहे या कारणास्तव बडतर्फीच्या आदेशात हस्तक्षेप केला.* त्यामध्ये *उच्च न्यायालयाने हस्तक्षेप केला* नाही.

१०.१ त्यामुळे, संक्षिप्त प्रश्न जो या न्यायालयाचा विचारीधीन ठेवला आहे तो असा आहे की खटल्याची तथ्ये आणि परिस्थितीत बडतर्फीची शिक्षा ही सिद्ध झालेल्या गैरवर्तनाशी प्रमाणबाह्य होती आणि म्हणूनच औद्योगिक न्यायालयाने बडतर्फीच्या आदेशात हस्तक्षेप करणे आणि सेवेत सातत्य ठेवून पुन्हा सेवेत सामावून घेण्याचा आदेश देणे योग्य होते या कारणावरून अन्यायकारक कामगार प्रथा म्हणता येईल.

१०.२ **विभागीय चौकशीत चौकशी अधिकाऱ्याने नोंदवलेले निष्कर्ष आणि कामगार न्यायालय तसेच औद्योगिक न्यायालयाने दिलेला** न्यायनिर्णय **व आदेश आणि फौजदारी न्यायालयाने दिलेला निकाल व निर्दोष मुक्ततेचा आदेशही असे दर्शवितो की** उत्तरार्थी **वाहन चालवत असताना** विरूद्ध दिशेने **येणाऱ्या** जीपसोबत **अपघात झाला आणि या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला.** अभिलेखावरील पुराव्यावरुन **असे दिसून येते की**, अपघाताचा आघात विरूद्ध दिशेने **येणाऱ्या जीपला इतका झाला की जीप २५ फूट मागे** ढकलली गेली. **वरील**

तथ्यांवरून असे म्हणता येईल की उत्तरारर्थी - **कामगार एवढ्या वेगाने आणि बेदरकारपणे वाहन चालवत होता ज्यामुळे अपघात झाला होता ज्यात चार जणांचा मृत्यू झाला होता.** भारतीय दंड संहिता **कलम २७९ आणि ३०४** (अ) **अन्वये** न्यायचौकशीला **सामोरे जात असलेल्या** उत्तरारर्थी-चालकाची **निर्दोष मुक्तता करताना, फौजदारी न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की ही घटना केवळ आरोपी** - उत्तरारर्थीच्या **बेदरकारपणे आणि निष्काळजीपणे वाहन चालविण्यामुळे आणि इतर** कोणाच्याही मुळे **नाही घडली हे सिद्ध करण्यात** अभियोग **पक्ष अपयशी ठरला.** त्यामुळेच **जीपचालकानेही** अधिक हलगर्जीपणा **केला असे गृहीत धरले, तरी हा** हानिकारक हयगय असल्याचा **प्रकार म्हणता येईल. याचा अर्थ** उत्तरारर्थी-**कामगार अजिबात निष्काळजी** नव्हता, **असा होत नाही. त्यामुळे तो गैरवर्तनातून मुक्त होत नाही.**

१०.३ **कामगार न्यायालयाने फौजदारी न्यायालयाने दिलेल्या निर्दोष मुक्ततेच्या आदेशाचा** सविस्तर **विचार केला होता आणि** उत्तरारर्थी-**कामगाराच्या वतीने केलेल्या युक्तिवादाशी सहमत नव्हते की फौजदारी न्यायालयाने त्याची निर्दोष मुक्तता केल्यामुळे त्याला शिस्तभंगाच्या कारवाईत दोषी ठरवता येणार नाही.**

१०.४ **फौजदारी न्यायालयाने दिलेला निकाल व** आदेशावरूनही असे **दिसून येते** की साक्षीदारांची फितूरी; हितसंबंधी साक्षीदाराने दिलेला पुरावा; **तपास अधिकाऱ्याच्या** तपासणीमधील **त्रुटी; घटनास्थळासाठी घटनेचा पंचनामा** करणारे **पंच,** इत्यादींच्या **आधारे** फौजदारी **न्यायालयाने** उत्तरारर्थी**ची निर्दोष मुक्तता केली. त्यामुळे** उत्तरारर्थी विरूद्ध **वाजवी संशयापलीकडे खटला सिद्ध करण्यात** अभियोग **पक्ष अपयशी ठरल्याचे फौजदारी न्यायालयाने म्हटले आहे. याउलट विभागीय** कार्यवाहीत **बेदरकारपणे व निष्काळजीपणे वाहन** चालविण्याचे गैरवर्तन **ज्यामुळे अपघात झाला व त्यामुळे चार जणांचा मृत्यू झाला, हे** स्थापित

आणि **सिद्ध झाले आहे. कायद्याच्या** आधारभूत **तत्त्वानुसार फौजदारी** न्यायचौकशीतील दोषमुक्तीचा **शिस्तभंगाच्या** कार्यवाहीवर **कोणताही परिणाम किंवा** संबंद्धता **नसते** कारण **दोन्ही प्रकरणांतील** पुराव्यांचे प्रमाण वेगळे **आहेत आणि कार्यवाही वेगवेगळ्या क्षेत्रात आणि भिन्न उद्दिष्टांसह चालते. त्यामुळे फौजदारी न्यायालयाने** उत्तरार्थी**ची निर्दोष मुक्तता करण्यावर जास्त भर देऊन औद्योगिक न्यायालयाने चूक केली आहे. असे असले तरी हे लक्षात घेणे आवश्यक आहे** की कार्यभार धारण केलेल्या **शिस्तपालन प्राधिकरणाने नोंदवलेले निष्कर्ष आणि विभागीय चौकशीत** सिद्ध झालेल्या गैरवर्तन सोबत **औद्योगिक न्यायालयाने हस्तक्षेप केलेला नाही, आणि केवळ या कारणास्तव बडतर्फीच्या शिक्षेत हस्तक्षेप केला आहे की ते आश्चर्यकारकपणे** प्रमाणबाह्य **आहे आणि म्हणूनच** एम.आर.टी.यु. आणि पी.यु.एल.पी. अधिनियम, १९७१ च्या **अनुसूची**-४ **च्या** खंड **क्रमांक** १ (**जी**) **नुसार अन्यायकारक कामगार प्रथा म्हणता येईल.**

१०.५ आता एम.आर.टी.यु. आणि पी.यु.एल.पी. अधिनियम, १९७१ च्या **अनुसूची**-४ **च्या** खंड **क्रमांक** १ (**जी**) चा वापर करून सेवेत सातत्य ठेवून पुन्हा सेवेत सामावून घेण्याचा आदेशित करणाऱ्या औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा विचार केला तर खंड **क्रमांक** १ (**जी**) नुसार, एखाद्या कर्मचाऱ्याची बडतर्फी किरकोळ किंवा तांत्रिक **स्वरूपाच्या** गैरवर्तणुकीसाठी असल्याचे आढळल्यास, विशिष्ट गैरवर्तनाचे स्वरूप किंवा कर्मचाऱ्याच्या सेवेच्या मागील नोंदीचा कोणताही विचार न करता, जेणेकरून आश्चर्यकारकपणे प्रमाणबाह्य शिक्षा होईल. एम.आर.टी.यु. आणि पी.यु.एल.पी. अधिनियम, १९७१ च्या **अनुसूची**-४ **च्या** खंड **क्रमांक** १ खालीलप्रमाणे आहे:-

"अनुसूची ४

१. (ए) सूड बुध्दीने;

(बी) मालकाच्या अधिकाराचा वापर करीत आहे असा आभास करुन, परंतु सद्भावपूर्वक नसेक अशाप्रकारे;

(सी) खोट्या पुराव्याच्या आधारे किंवा कुटरचित पुराव्यांच्या आधारे फौजदारी गुन्हयामध्ये एखाद्या कर्मचाऱ्याला अडकवून;

(डी) उघट उघट खोट्या कारणांसाठी;

(ई) परवानगीविना अनुपस्थिति संबंधीची असत्य किंवा बनावट अभिकथने करुन;

(एफ) अंतर्गत चौकशी करताना न्यायाच्या तत्वांकडे पुर्णपणे दुर्लक्ष करुन किंवा अवाजवी घाई करुन;

(जी) गैरवर्तुणुकीच्या किंवा तांञिक गैरवर्तुणूकीबद्दल त्या विशिष्ट गैरवर्तणुकीचे स्वरुप काय याबद्दल किंवा कर्मचा-यांच्या मागील सेवेच्या अभिलेखाबदद्ल कोणताही विचार न करता धक्कादायक ठरेल अशी अवास्तव शिक्षा देवून ;.

- कर्मचा-यास सेवामुक्त करणे किंवा बडतर्फ करणे."

एम.आर.टी.यु. आणि पी.यु.एल.पी. अधिनियम, १९७१ च्या **अनुसूची-४ च्या** खंड **क्रमांक** १ (**जी**) **सध्याच्या प्रकरणात** लागु करताना **असे म्हणता येणार नाही की** उत्तरार्थीची

बडतर्फी गैरवर्तनाच्या स्वरूपाचा विचार न करता, किरकोळ किंवा तांत्रिक स्वरूपाच्या गैरवर्तणुकीसाठी होती. उत्तरार्थी - **कामगाराला विशिष्ट आरोप आणि विशिष्ट गैरवर्तनासाठी दोषी ठरवण्यात आले आहे.** उत्तरार्थीच्या **सेवेच्या मागील** अभिलेखाचाही **औद्योगिक न्यायालयाने विचार केलेला नाही.** अपीलकर्ता - एम एस आर टी सी उत्तरार्थीच्या **प्रकरणानुसार - कामगार तीन वर्षांपासून सेवेत होता आणि तीन वर्षांच्या सेवेच्या काळात** त्याला **चार वेळा शिक्षा झाली. त्यामुळे बडतर्फीचा आदेश** उत्तरार्थीच्या **सेवेच्या मागील** अभिलेखाचा **विचार न करता झाला असे म्हणता येणार नाही. त्यामुळे या प्रकरणातील** तथ्ये **आणि परिस्थिती पाहता औद्योगिक न्यायालयाने** एम.आर.टी.यु. आणि पी .यु.एल.पी. अधिनियम, १९७१ च्या **अनुसूची-४ च्या** खंड **क्रमांक** १ (**जी**) **चा चुकीच्या पद्धतीने वापर केला.**

११. **असे असले तरी** सद्य प्रकरणाच्या तथ्ये मध्ये **विभागीय चौकशीत असे आढळून आले आहे की, चालक** - उत्तरार्थी **यांच्या बेदरकारपणे आणि निष्काळजीपणे वाहन चालविल्यामुळे अपघात झाला ज्यात चार जणांचा मृत्यू झाला,** जेव्हा **बडतर्फीची शिक्षा ठोठावली जाते तेव्हा** तिला **धक्कादायक** प्रमाणबाह्य **शिक्षा म्हणता येणार नाही. विभागीय** कार्यवाहीमध्ये **प्रत्येक पैलूचा विचार करण्यात आला आहे. अगदी विभागीय** कार्यवाहीमध्ये **चौकशी अधिकाऱ्याने नोंदविलेल्या निष्कर्षांमध्ये औद्योगिक न्यायालयाने हस्तक्षेप केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणातील** तथ्ये **आणि परिस्थितीत औद्योगिक न्यायालयाने गंभीर चूक केली असून शिस्तपालन प्राधिकरणाने दिलेल्या** बडतर्फीच्या **आदेशात हस्तक्षेप करताना आपल्या** अधिकारक्षेत्राच्या पलीकडे गेलेला **आहे, ज्यात कामगार न्यायालयाने हस्तक्षेप केला नाही.**

१२. **हे देखील लक्षात घेणे आवश्यक आहे की औद्योगिक न्यायालयासमोर** उत्तरार्थी-**कामगार**-चालकाने **कबूल केले की बडतर्फीच्या आदेशानंतर** तो लाभदायकपणे कामाला लागलेला आहे**. त्यामुळे सेवेत सातत्य ठेवून सेवेत पुन्हा** सामावून करणे सुद्धा **आवश्यक नव्हते.**

१३. उत्तरार्थी-**कामगाराला** ०१.११.२००३ ते ३१.०५.२०१८ **या कालावधीतील वेतन देण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिलेले निर्देशही उच्च न्यायालयाने अपीलकर्त्याने दाखल केलेल्या रिट याचिकेत दिले जाऊ शकले नसते. ती कामगार-**उत्तरार्थीने **दाखल केलेली याचिका नव्हती. त्यामुळे असे असले तरी** अक्षेपित न्यायनिर्णय **व आदेशाच्या परिच्छेद ८ मध्ये दिलेले** निदेश **कायम ठेवता येणार नाहीत कारण ते उच्च न्यायालयासमोरील वादाच्या कक्षेबाहेर आहेत.**

१४. वरील बाबी लक्षात घेता व वर नमूद केलेल्या कारणांमुळे सध्याचे अपील यशस्वी ठरते. पुनरीक्षण अर्ज (यूएलपी) क्रमांक १३ / २००२ मध्ये औद्योगिक न्यायालयाने दिलेला न्यायनिर्णय व आदेश आणि रिट याचिका क्रमांक ८४०१ / २००३ मध्ये उच्च न्यायालयाने दिलेला आक्षेपित न्यायनिर्णय व आदेश रद्द बातल ठरवला जातो आणि तक्रार (यूएलपी) क्रमांक ९६ / १९९३ मध्ये कामगार न्यायालयाने दिलेला न्यायनिर्णय आणि निवाडा प्रत्यास्थापन करण्याचे आदेश दिले जातात. परिणामी, उत्तरार्थी - कामगाराला सेवेतून बडतर्फ करण्याचा शिस्तपालन प्राधिकरणाने दिलेला बडतर्फीचा आदेश याद्वारे कायम ठेवला जातो. सध्याचे अपील उपरोक्त मर्यादेपर्यंत मान्य केले आहे. खर्चाबाबत कोणतेही आदेश असणार नाहीत.

अपील मान्य केले.

x-x-x-x

<u>अस्वीकरण</u>

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील ह्या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये न्यायनिर्णयाचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणांसाठी वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायन्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.